कुरार पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक - १६/१०/२०२६

प्रेस नोट

**इमिटेशन ज्वेलरी कामासाठी आणलेल्या १७ अल्पवयीन बाल कामगार यांची सुटका केलेबाबत .....**

- - - -

दिनांक १५/१०/२०२६ रोजी दुपारी १४.०० वाजताचे सुमारास कुरार पोलीस ठाणे हददीतील गुलाबसिंग चाळ, रूम नं. १५, कोकणीपाडा, कुरारगांव मालाड ( पुर्व ) मुंबई. या ठिकाणी १० बाय १२ च्या अंरूद खोलीमध्ये १४ ते १६ वयोगटातील अल्पवयीन मुले इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी आणुण त्यांच्याकडुन १५ ते १६ तास कष्टाचे कामे करून त्यांची शारीरिक छळवणुक व पिळवणुक करीत असल्याबाबत प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक भारत दराडे, बीट अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजित ठाकुर, निर्भया पथकांचे महिला अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी ठिकाणी छापा टाकला असता, इसम नामे जितेंद्रकुमार गोपाल चौधरी वय ३८ वर्षे यांने एकुण १७ अल्पवयीन मुलांना इमिटेशन ज्वेलरीचे धोकादायक स्थितीत काम करण्यास भाग पाडले म्हणुन आरोपीत इसमांचे विरोधात गु.र.क्र ११६०/२६, कलम १४६, भा.न्या.संहिता सह कलम ७५, ७९ अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण कायदा ) २०१५ सह कलम ३, ३(अ), १४ बाल कामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा १९८६ अन्वये गुन्हा दाखल करून गुन्हयात आरोपीस अटक करण्यात आली आहे. एकुण १७ अल्पवयीन मुंलाची सुरक्षित सुटका करण्यात आली असुन, त्यांना बाल सुधार गृहात ठेवण्यात आले आहे.

मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ- ३, मुंबई, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, समतानगर विभाग, मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुरार पोलीस ठाणे, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली नमुद पथकांने कारवाई केली आहे.

- - - -

Scanned with OKEN Scanner